# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

पुनर्विलोकन अर्ज १४२ / २०२४

(मुळ अभिवेदन क्र. ८९ / २०२४ च्या अभिवेदनाबाबत)

नावातील बदलाबाबत

अशोक रामराव भांबे ................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादीत (महावितरण) भांडूप ................................ प्रतिवादी १

गीता मनोज यादव ................................................................ प्रतिवादी २

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अशोक रामराव भांबे

प्रतिवादीं १ तर्फे :- १. सुधीर कन्नवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, ईश्वर नगर उपविभाग
२. योगेश मैन, उपप्रबधक
३. प्रितम जाधव, उपप्रबधक

प्रतिवादी २ तर्फे :- गैरहजर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १२ नोव्हेंबर २०२४

आदेश पारित दिनांक :- ५ डिसेंबर २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम 2020 (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम 2020) मधील विनियम २२ नुसार अभिवेदन क्र. ८९/२०२४ बाबत

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

मा.विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजीच्या पारीत आदेशाविरूध्द अपिलार्थींनी सदरचा पुनर्विलोकन अर्ज दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी दाखल केला आहे.

२. मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांनी अभिवेदन क्रं. ८९ /२०२४ च्या दिनांक २० सप्टेंबर २०२४ च्या पारित आदेशात खालीलप्रमाणे आदेश दिले.

*"९. मंचाने जारी केलेल्या आदेशात फेरफार वा हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही. सबब, मंचाचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.*

*१०. अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे."*

३. सदर पुनर्विलोकन अर्जाची सुनावणी दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी झाली. त्यावेळी सुनावणी करीता अपिलार्थी व्यक्तीशः तर प्रतिवादी हे व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे हजर होते. दोन्ही पक्षकारानी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. अपिलार्थीने अभिवेदनातील व सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

1) अपिलार्थी श्री. अशोक रामराव भांबे हे रूम (सर्व्हेक्षण) नं.७६, शेख चाळ, एस.व्ही.रोड, सोलारीस मार्ग, पवई, मुंबई - ७२ येथील रहिवाशी आहेत. अपिलार्थींनी सदर रूम प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव, राहणार रूम नं १ शंकर मंदिरा समोर शेख चाळ, एस.व्ही.रोड, शिवशक्ती नगर पवई, मुंबई - ७२ यांच्याकडून रक्कम रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर (SR.No.835 Dated 23.03.2021) नोटरी केलेल्या खरेदीखतानुसार रक्कम रु.६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा लक्ष मात्र) ला खरेदी केली. त्यासाठी खालीलप्रमाणे रोख रक्कम देण्यात आली.

तक्ता - १

| अनुक्रमांक | रोखीची रक्कम (रु.) | दिनांक |
|---|---|---|
| १ | २,२०,०००/- | २३.३.२०२१ |
| २ | १,००,०००/- | २५.३.२०२१ |
| ३ | १०,०००/- | २९.३.२०२१ |
| ४ | २,७०,०००/- | ३१.३.२०२१ |
| एकुण रु. | ६,००,०००/- | |

2) खरेदीखतानुसार अदा केलेली रक्कम रु.६,००,०००/- मात्र गिता यादव यांनी चार साक्षीदारांच्या समोर रेव्हेन्यु स्टॅंप पेपरवर समक्ष सह्या घेऊन त्यांच्यासमोर दिनांक ३१.३.२०२१ रोजी सदर रक्कम मिळाल्याची

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

अपिलार्थीस पोच दिली. खरेदीखतात लिहील्याप्रमाणे अपिलार्थीस ३१.३.२०२१ रोजी रूमचा ताबा मिळाला. अपिलार्थीस प्रतिवादी २ यांच्या नावावर असलेला ग्राहक क्रं.०००६०१३५२८२ या वीज जोडणीवरून वीज पुरवठा मिळत होता. वीज देयकातील नाव बदलीबाबत तडजोड म्हणून अपिलार्थीकडून रू.४७,९००/- (रू.सत्तेचाळीस हजार नऊशे मात्र) रक्कमेची थकबाकी असलेले वीज देयक प्रतिवादी २ यांनी भरून घेतले. मात्र, वीज देयक अपिलार्थींच्या नावावर करून दिले नाही.

3) अपिलार्थीने वीज देयकावरील नावात बदल (Change of Name Application) करण्यासाठी दिनांक २ फेब्रुवारी २०२२ रोजी महावितरणकडे अर्ज (अर्ज क्रं.३८४१८१८९) केला. सदर अर्जाचा पाठपुरावा केल्यानंतर प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी अपिलार्थी आणि त्यांच्यातील खरेदी व्यवहार पूर्ण झाला नसल्याचे कारण देऊन दिनांक २६ मार्च २०२२ च्या पत्रान्वये सदर वीज जोडणीच्या नावातील बदलास हरकत घेतली म्हणून वीज देयकाचा नावात बदल केला नाही.

4) अपिलार्थीच घर झोपडपट्टी श्रेणीमध्ये येत असल्यामुळे त्याचे खरेदीखत नोंदणीकृत करण्याची तरतूद नाही. परंतू नोटरीसमक्ष खरेदीखत नोटरी झाले असेल आणि नोटरी नोंदवहीमध्ये त्याची नोंद असेल म्हणजेच (रजिस्टर नोटरी) तर ते खरेदीखत कोणत्याही शासकीय कार्यालयात पात्र ठरेल अशी माहिती अपिलार्थीस नोंदणी व मुद्रांक विभागाने तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई या कार्यालयाकडून समजली.

5) अपिलार्थीस वीज जोडणी देण्याबाबत प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी आक्षेप घेतला असून त्याबाबत पवई पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केलो, हे प्रतिवादी २ यांचे म्हणणे चुकीचे आहे. तपास अधिकारी श्री. प्रविण ठोंबरे व श्रीमती माधूरी झेडगे पवई पोलीस ठाणे यांनी सदर प्रकरण निकाली काढले असून याबाबत प्रतिवादी २ यांना दिवाणी न्यायालयात दाद मागण्याची समज दिली.

6) अपिलार्थीने त्यांच्या वीज देयकातील नावात बदल करण्यास प्रतिवादी २ यांचा आक्षेप असल्याचे प्रतिवादी महावितरणचे म्हणणे चुकीचे आहे; कारण, वीज देयकास ना हरकत घेतानाचा व्हिडीओ प्रतिवादी महावितरणचे अधिकारी यांनी कार्यालयात रेकॉर्ड केलेला आहे व त्यानंतरच अंतिम दस्त तयार झाला आहे आणि सदर तडजोडीच्या दस्तानुसार अपिलार्थीने रक्कम रू.२,००,०००/- (रू.दोन लक्ष मात्र) प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांना दिनांक ७ सप्टेंबर २०२१ रोजी धनादेशाद्वारे देण्यात आलो. सदर व्यवहाराचे साक्षीदार म्हणून गीता मनोज यादव यांचे पती यांची सही आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

7) त्यानंतर दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी पत्रान्वये प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी सहाय्यक अभियंता, निटी शाखा, महावितरण, यांना वीज देयकावरील नाव बदलाबाबत कोणतीही हरकत नसल्याचे कळविले. तरीही प्रतिवादी महावितरणने नावात बदल करण्याबाबत टाळाटाळ केली. अपिलार्थीनी नमुद केले की, सर्व कागदपत्राची पुर्तता करूनही त्यावर तात्काळ कार्यवाही का करण्यात आली नाही व २०२२ ची जूनी तक्रार का ग्राह्य धरली जात आहे?.

8) अपिलार्थीने विनंती केली की, प्रतिवादी २ यांच्या नावावर असलेला वीज मीटर वादग्रस्त आहे. प्रतिवादी २ यांनी सदर मीटर त्रयस्त व्यक्तीला हस्तांतरण करू नये, असे निर्देश महावितरण कार्यालयास देण्यात याव, कारण की, बी. एम. सी. च्या सर्वेक्षणानुसार त्यांच्या अधिकाऱ्यांनी प्रतिवादी २ यांचा वीज मीटर पुरावा म्हणून अपिलार्थीच्या यादीमध्ये मान्य केलेला आहे. त्याबाबतची माहिती सोबतच्या तक्ता क्र.२ मध्ये दिली आहे.

तक्ता - २

| SR. No. | Struct No. | Name of the owner / occupier | Type of Structure | Details of affected structure | | | % Affected | Documents submitted by owner / ocupier |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | L(M) | W (M) | Area (Sq. M) | | |
| 51 | 76 | Ashok Ramarav Bhambe | Residential | 4.76 | 2.03 | 9.66 | 100 | १) झोपडपट्टी धारकाचे ओळखपत्र सर्वेक्षण 2000 पावती 1593967 dated Name of Geeta Yadav |
| | | | | | | | | 2) Ration Card No. 0130821 Name of Geeta Yadav |
| | | | | | | | | 3) Maharashtar Sate Electricity Bill Consumer No. 000060135282 dtd.27.10.2020 Name of Geeta M. Yadav (LT-II) |
| | | | | | | | | 4) Election Card No. HCF1809938 Name of Geeta Ramu Yadav |
| | | | | | | | | 5) Order from Office of the Additional Tahasildar(N.A.) Kurla - 1 dated 15.11.2002 regarding unauthorised non-agricultural use name of Taraswaruoop proprietors and occupier Geeta Manoj Yadav |

9) अपिलार्थीने आपल्या केसचे साक्षीदार म्हणून प्रकाश नाना बनसोडे यांचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. साक्षीदारांचे म्हणणे खालीलप्रमाणे.

*"श्रीमती गीता मनोज यादव यांनी लाईट बिल कार्यालयाकडे विना आधार खोटया तक्रारी देऊन श्री अशोक रामराव भांबे यांना त्रास देण्यास सुरवात केलेली आहे. बीएमसी कार्यालयाने सर्व परिस्थिती जाणून घेतल्यानंतर त्यांनीही श्रीमती गिता मनोज यादव यांच्या तक्रारी घेणे बंद केले. सदर विज बिल देयक नावावर करण्यासाठी दोन लाख रुपये चेकने घेतल्यानंतर श्रीमती गिता मनोज यादव यांनी श्री अशोक रामराव भांबे यांना ना हरकत पत्र दिले असून, ना हरकत पत्रात मी साक्षीदार म्हणून सही केली आहे."*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

10) अपिलार्थीने आधार कार्ड, मतदान कार्ड व स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच पासबूक वरील पत्ता ही सदर रूमच्या पत्त्यानुसार बदलला आहे. अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी सदर रूमवरील आपला मालकी हक्क सिध्द करावा, अशी मागणी केली आहे.

३. प्रतिवादी १ ने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

1) ग्राहक क्रं. ०००0६०१३५२८२ चे वीज देयक हे प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांच्या नावे असून त्याचा वापर ते करत आहेत. अपिलार्थीनी वीज देयकावरील नावात बदल (Change of Name Application) करण्यासाठी दिनांक २ फेब्रुवारी २०२२ रोजी महावितरणकडे अर्ज (अर्ज क्रं.३८४१८१८९) केला. अपिलार्थीनो सदर रूम प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांच्याकडून खरेदी केलेली आहे. 'खरेदी करार' हा रक्कम रू.१००/- च्या साध्या स्टँम्प पेपरवर (SR.No.835 Dated 23.03.2021) दिनांक २३ मार्च २०२१ रोजी नोटरी करून केलेला आहे. परंतू या दोघांमधील खरेदी विक्री पूर्ण झाल्याचे नोंदणीकृत खरेदी खत सादर केलेले नाही.

2) प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांनी दिनांक २८ जुलै २०२१ च्या पत्रान्वये (आवक क्र.२६२५) कळविले की, अपिलार्थीने सदर खोलीचे खोटे पेपर बनवून प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांची सही घेतली. अपिलार्थी सध्या वीज जोडणी घेण्यासाठी महावितरणकडे अर्ज करोत आहेत, तरो अपिलार्थीना नवीन मीटर देण्यात येऊ नय. तसेच, या प्रकरणी पवई पोलीस स्टेशनमध्ये चौकशी / तपास चालू आहे.

3) अपिलार्थीने वीज देयकावरील नावात बदल करण्यासाठीचा दिनांक २ फेब्रुवारी २०२२ रोजी ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर केलेल्या अजास प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांनी तीव्र हरकत घेतल्याचे पत्र उपविभागीय कार्यालय महावितरणला दिले. दिनांक २६ मार्च २०२२ च्या सदर पत्रात प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांनी नमुद केले की, अपिलार्थी आणि त्यांच्यातील खरेदी व्यवहार पूर्ण झाला नसून सदर व्यवहारातील अर्धे पैसे अपिलार्थी यांच्याकडून येणे बाकी आहेत, त्यामुळे नवीन मीटर बसविण्यात हरकत आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

4) प्रतिवादी महावितरणने नमुद केले की, प्रतिवादी २ श्रीमती गीता मनोज यादव यांच्या नावावर असलेला वीज मीटर (ग्राहक क्र. ०००६०१३५२८२) ची माहिती (जसे, नाव, पत्ता व इतर बाबीं) तक्ता क्र.३ मध्ये दिली आहे.

तक्ता - ३

| ग्राहकाचे नाव | ग्राहक क्र. | पुरवठा दिनांक | युनिट | दर संकेत | मंजूर भार |
|---|---|---|---|---|---|
| Geeta Manoj Yadav | 60135282 | 30.12.2002 | 4732 Iswar Nagar S/D | 052/LT II Comm 1Ph<20KW | 2.4 KW |

सदर वीज जोडणी ही वाणिज्य वर्गवारीची असून त्यावर चाळीतील इतर रहिवाशींच्या सुध्दा वीज जोडण्या आहेत. तसेच, अपिलार्थींना सदर रूम साठी नवीन वीज जोडणी घेण्यासाठी नव्याने अर्ज करण्याचे प्रतिवादीने कळविले, परंतू अपिलार्थीकडून त्याबाबत कोणताही अर्ज प्रतिवादीकडे आला नाही. प्रतिवादीने नमुद केले की, प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी अपिलार्थीस नवीन वीज जोडणी देण्यासाठी सुध्दा हरकत घेतलेली आहे. व्हिडीओ रेकॉर्डींगचा पुरावा निमशासकीय कार्यालयात ग्राह्य धरला जात नाही, तसेच, त्या व्हिडीओ रेकॉडींगच्या सत्यत बाबतही प्रश्नचिन्ह आहे; म्हणून सदर पुरावा विचारात घेतला जाऊ नये.

5) अपिलार्थीचा नावात बदल करण्याच्या अर्जासोबत मुळ ग्राहक प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर केले नाही. म्हणून नावात बदल करण्याबाबतचा अर्ज परिपूर्ण नाही. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थी व प्रतिवादी २ यांनी दोंघामध्ये असलेले मतभेद सामंज्यसनाने तोडगा काढून सोडेवावे आणि प्रतिवादी महावितरणला यामध्ये विनाकारण न ओढता महावितरणचा त्रास टाळावा.

6) ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०२० मधील विनियम २२ (२२.१) मध्ये नमुद केलेल्या तरतूदीननसार अपिलार्थीने दाखल केलेल्या पुनर्विलोकन अर्जात अशी कोणतीही नवीन बाब वा मागणी निदर्शनास येत नाही. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे अशी प्रतिवादी १ यांनी विनंती केली.

४. प्रतिवादी २ यांच्याकडून सदर पुनविलोकन अर्जा प्रकरणी कोणतेही लेखी उत्तर सादर केलेले नाही तसेच, त्या सुनावणीदरम्यान गैरहजर होत्या.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

## विश्लेषण व निर्णय

५. पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थींनी नमुद केले की, अपिलार्थींचे घर झोपडपट्टी श्रेणीमध्ये येत असल्यामुळे त्याचे खरेदीखत नोंदणीकृत करण्याची कायद्यात तरतूद नाही. अपिलार्थीस वीज जोडणी देण्याबाबत प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी आक्षेप घेतला असून त्याबाबत पवई पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली हे प्रतिवादी २ यांचे म्हणणे चुकीचे आहे. तपास अधिकारी पवई पोलीस ठाणे यांनी सदर प्रकरण निकाली काढले असून याबाबत प्रतिवादी २ यांना दिवाणी न्यायालयात दाद मागण्या बाबतची समज दिली. अपिलार्थीने त्यांच्या वीज देयकातील नावात बदल करण्यास प्रतिवादी २ यांचा आक्षेप असल्याचे प्रतिवादी महावितरणचे म्हणणे चुकीचे आहे. ना हरकत घेतानाचा व्हिडीओ हा व प्रतिवादी महावितरणचे अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात रेकॉर्ड केलेला असून त्यानंतरच 'अंतिम दस्त' तयार केला आणि सदर तडजोडीच्या दस्तानुसार अपिलार्थीने रक्कम रू.२,००,०००/- (रू.दोन लक्ष मात्र) प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांना दिनांक ७ सप्टेंबर २०२१ रोजी चेकमार्फत देण्यात आली. त्यानंतर दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी पत्रान्वये प्रतिवादी २ गीता मनोज यादव यांनी सहाय्यक अभियंता निटी शाखा महावितरण यांना वीज देयकावरील नाव बदलाबाबत कोणतीही हरकत नसल्याचे कळविले. तरीही प्रतिवादी महावितरणने नावात बदल करण्याबाबत टाळाटाळ केली. अपिलार्थीने नमुद केले की नावात बदल करण्याच्या सर्व कागदपत्राची पुर्तता करूनही त्यावर प्रतिवादीने तात्काळ कार्यवाही केली नाही. आपल्या केसचे साक्षीदार म्हणून अपिलार्थीने प्रकाश नाना बनसोडे यांचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. साक्षीदाराने सुध्दा नमुद केले आहे की, श्रीमती गीता मनोज यादव यांनी लाईट बील अपिलार्थीच्या नावावर करण्याचे मान्य केले होते. अपिलार्थीने आधार कार्ड, मतदान कार्ड व स्टेट बँक ऑफ इंडीया बक पासबूक वरील पत्ता हा सदर रूमच्या पत्त्यानुसार बदलला आहे. सर्व कागदपत्रांचा विचार करता अपिलार्थीच्या नावावर ग्राहक क्र. ०००६०१३५२८२ करणे कायदेशीर आहे.

७. प्रतिवादी महावितरणने नमुद केले की, सदर वीज जोडणी ही वाणिज्य वर्गवारीतील असून त्यावर चाळीतील इतर रहिवाशींच्या सुध्दा वीज जोडण्या आहेत. तसेच, अपिलार्थींना सदर रूम साठी नवीन वीज जोडणी घेण्यासाठी नव्याने अर्ज करण्याचे प्रतिवादीने कळविले, या बाबीचा मा. विद्युत लोकपाल यांच्या मुळ अभिवेदनातील आदेशात सुध्दा याचा उल्लेख होता. परंतू अपिलार्थीकडून त्याबाबत कोणताही अर्ज प्रतिवादीकडे आलेला नाही. अपिलार्थींनी पुनर्विलोकन अर्जात नमुद केलेले मुद्दे हे मुळ आदेशात सुध्दा विचारात घेतले होते.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

आदेशाच्या निर्णयावार परिणाम करणारा कोणताही नवीन मुद्दा पुनर्विलकोन अर्जात मांडला नाही. सबब अपिलार्थीचा पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात यावा.

८. अपिलार्थी यांनी सदर पुनर्विलोकन अर्जात कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केलेले नाहीत; की, ज्यामुळे मुळ आदेशात बदल करणे गरजेचे आहे. पुनर्विलोकन याचिकेची व्याप्ती ही मर्यादित असते; मात्र, अपिलार्थी या ठिकाणी पुनर्विलोकन याचिकेच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची पुनश्चः सुनावणी घेण्याची विनंती करीत आहेत, असे, प्रथम दर्शनी दिसते. मात्र, मुळ आदेशांचा नव्यान आढावा घेण्याचे कोणतेच कारण समोर आलेले नाही.

९. ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०२० मधील विनियम २२ मध्ये आदेशाचे पुनर्विलोकना बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे :-

*"२२ विद्युत लोकपालाच्या आदेशाचे पुनर्विलोकन :*

*२२.१ विद्युत लोकपालाच्या आदेशाने बाधीत झालेली कोणतीही व्यक्ति, वितरण परवानाधारकासह, आदेशाच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत अशा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी त्याच विद्युत लोकपालाकडे खालील परिस्थितीत, अर्ज करील:*

*ए. जेथे कोणत्याही अपिलास प्राधान्य देण्यात आले नाही.*

*बी. अभिलेख्यावरून चूक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्यास.*

*सी. एखादी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा मिळाला, जो योग्य काळजी घेऊनही तिला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश पारीत करण्यात आला त्या वेळेस सादर करू शकला गेला नाही.*

*२२.२ अशा पुनर्विलोकनासाठीच्या अर्जात ती बाब किंवा पुरावा, जो योग्य काळजी घेऊनही अर्जदाराला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला गेला नाही, किंवा अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसते त्याबाबत, स्पष्टपणे नमुद करण्यात येईल.*

*२२.३ पुनर्विलोकन अर्जासोबत विद्युत लोकपाल निश्चित करेल अशी कागदपत्रे, पुष्टयर्थ माहिती आणि निवेदने जोडण्यात येतील.*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

*२२.४ विद्युत लोकपालास जर पुनर्विलोकनासाठी पुरेसे कारण नसल्याचे वाटल्यास, विद्युत लोकपाल असा पुनर्विलोकन अर्ज फेटाळेल.*

*परंतू असे की, अर्जदाराला त्याची बाजु मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही.*

*२२.५ जर विद्युत लोकपालाचे असे मत झाले की, पुनर्विलोकन अर्ज मंजूर करणे योग्य आहे, तर विद्युत लोकपाल तो मंजूर करेल. परंतू असे की, पुनर्विलोकनाचा अर्ज ज्या आदेशाच्या संदर्भात करण्यात आला आहे त्याच्या समर्थनार्थ उपस्थित राहणे व त्याची बाजू ऐकली जाणे शक्य व्हावे म्हणून, विरोधी पक्षकाराला पुर्व-सूचना दिल्याशिवाय असा अर्ज मंजूर केला जाणार नाही."*

तसेच सुप्रिम कोर्टाने त्याबाबत कमलेश वर्मा विरूध्द मायावती व इतर केस मध्ये खालील प्रमाणे निर्णय दिला होता.

*"The Judgement of the Supreme court in Kamlesh Varma v/s Mayawati and Ors reported in 2013 AIR (SC) 3301, which held as: -*

> *"8) This Court has repeatedly held in various judgments that the jurisdiction and scope of review is not that of an appeal and it can be entertained only if there is an error apparent on the face of the record. A mere repetition through different counsel, of old and overruled arguments, a second trip over ineffectually covered grounds or minor mistakes of inconsequential import are obviously insufficient.""*

१०. अपिलार्थी, प्रतिवादी १ यांनी मांडलेल्या मुद्दयांचा या आधीच्या अभिवेदन क्रं.८९/२०२४ मध्ये पुर्णतः समावेश केलेला असून सर्व बाबी, मुद्दे गुणवत्तेशी सांगड घालून विचारात घेतलेले आहेत. अपिलार्थींनी त्यांच्या दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पुनर्विलोकन अर्जात कोणतेही नवीन मुद्दे मांडलेले वा उपस्थित केलेले नाहीत. तसेच, मुळ आदेशाचे पुनर्विलोकनाकरीता कोणतेही 'पुरेसे कारण' असल्याचे स्पष्ट होत नाही वा निदर्शनास येत नाही. सबब, **मुळ आदेशाचे पूनर्विलोकन करावे असे कोणतेच ठोस कारण अपिलार्थी त्यांच्या पुनर्विलोकन अर्जात न देता पुनच्छः त्याच कारणासाठी पुनर्विलोकन अर्ज दाखल करून शासकीय यंत्रणेचा वेळ वाया घालविला याबाबत हे न्यायासन खेद व्यक्त करीत आहे.**

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

११. अपिलार्थीचे पुनर्विलोकन अर्ज नामंजूर करण्यात येत असून व निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.